# देवी - भाग  दोन

या नाना, या मुलांना सांगा बरं आता
देवी का येत नाहीत ते.– आजोबा

नाना- देवीची लस आहे ना! लस टोचून घेतली की
देवी येत नाहीत. लहानपणीच देवी काढल्या की
काही भीती नाही.

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई- ४००००५
प्रकाशक : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
पुणे- ४११०२९

गणू- मग आजोबांना कशा आल्या? लस नव्हती?

नाना- होती ना! पण आपला देश केवढा मोठा. किती तरी लहानमोठी गावे. प्रत्येक खेड्यात जायचं, लोकांना गोळा करायचं, लस टोचायची. मोठं काम. पण आपण स्वतंत्र झाल्यावर हे सगळं केलं. खूप लस तयार केली. गावोगावी देवी काढणारे डॉक्टर गेले. त्यांनी सर्वांना फुकट देवी काढल्या. आता पहा देवी कुणाला होतच नाहीत.

रमा- खरं की काय ?

नाना- हो तर! गेल्या सात-आठ वर्षात सबंध भारतात कुणालाही देवी आल्या नाहीत.

आजोबा- तुम्ही किती नशीबवान आहात! आमच्या वेळी ही सोय नव्हती. लहान खेड्यात कोणी डॉक्टर येतच नसे. आम्हाला वाटायचं देवी कोपली की फोड्या येतात. मग लोक देवीला, मरी आईला नवस करायचे, बळी देखील देत. पण त्याचा उपयोग काय होणार?

गणू- पण नाना देवी टोचल्यावर काय होतं?

नाना- काही होत नाही. जरा दुखतं. ताप येतो, टोचलेल्या जागी फोड येऊन लगेच बरा पण होतो. मग देवी येत नाहीत.

आजोबा- अरे मुलांनो! तुम्ही कशाला भिता? आपापले दंड पहा. सगळ्यांना देवी काढलेल्या आहेत.

